स्थायी समितीच्या **गुरुवार दिनांक 11–06–2015** रोजी **सायंकाळी 05–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 3. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 4. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 5. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 6. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 7. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 8. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 9. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 10. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 11. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 12. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 13. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 14. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 2. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 83:— विभागीय तांत्रिकदृष्टया निर्लेखित असलेली वाहने व इतर भंगार साहित्य उच्चतम निविदा दराने विक्री करणेबाबत.

विभागाने तीनवेळा निविदा मागवून प्रतिसाद मिळाला नसल्याने विकल्या न गेलेली 20 फायर टेंडर, 2 शववाहिका व 3 जीप अशी एकुण 25 वाहने खुली विक्री करून घेणे. व या वाहनांव्यतिरीक्त विभागाकडे आणखी निर्लेखित असलेले 4 वाहने मशिनरी, व इतर भंगार साहित्य निर्लेखन मुल्यावर ई–निविदेद्वारे विक्री करून घेण्यासंदर्भातील मंजूर **स्थायी समिती ठराव क्र. 54 दि. 14.07.2014** प्रमाणे ई–निविदा मागविण्यात आली. यामध्ये 5 निविदाकारांची ई–निविदा विभागाला प्राप्त झाली. ज्यामध्ये M/s. M. I. Engineering Stores, Nagpur यांचे उच्चतम निविदादर प्राप्त झाले. सदर फर्मकडून खालीलप्रमाणे वाटाघाटी दर मागविण्यात आले.

| Sr. No. | Particulars | Qty | Value | Tender Rate | Negotiatios Rate |
|---|---|---|---|---|---|
| | **Vehicles** | | | | |
| 1 | MWY -9273 | 1 | Open Sale | 72,000 | 73500/- |
| 2 | MTG-3625 | 1 | Open Sale | 71,000 | 72500/- |
| 3 | MWY-9084 | 1 | Open Sale | 71,000 | 72500/- |
| 4 | MWY-9085 | 1 | Open Sale | 73,000 | 74500/- |
| 5 | MZV-9082 | 1 | Open Sale | 72,000 | 73500/- |
| 6 | MWY-9267 | 1 | Open Sale | 74,000 | 75500/- |
| 7 | MWY 9268 | 1 | Open Sale | 72,000 | 73500/- |
| 8 | MWY 9042 | 1 | Open Sale | 73,000 | 74500/- |
| 9 | MWY 9095 | 1 | Open Sale | 71,000 | 72500/- |
| 10 | MWY 9274 | 1 | Open Sale | 72,000 | 73500/- |
| 11 | MWY 9096 | 1 | Open Sale | 73,000 | 74500/- |
| 12 | MZV 9052 | 1 | Open Sale | 71,000 | 72500/- |
| 13 | MWY 9270 | 1 | Open Sale | 72,000 | 73500/- |
| 14 | MWY 9269 | 1 | Open Sale | 74,000 | 75500/- |
| 15 | MWY 9271 | 1 | Open Sale | 72,000 | 73500/- |
| 16 | MWY 9111 | 1 | Open Sale | 71,000 | 72500/- |
| 17 | MWY 5229 | 1 | Open Sale | 70,000 | 71500/- |
| 18 | MWY 9272 | 1 | Open Sale | 75,000 | 76500/- |
| 19 | MWY 9112 | 1 | Open Sale | 73,000 | 74500/- |
| 20 | MWY 9113 | 1 | Open Sale | 75,000 | 76500/- |
| 21 | MZV 9069 | 1 | Open Sale | 40,000 | 41000/- |
| 22 | MZV 9127 | 1 | Open Sale | 40,000 | 41000/- |
| 23 | MZV 8352 | 1 | Open Sale | 25,000 | 26000/- |
| 24 | MZV 9226 | 1 | Open Sale | 22,000 | 23000/- |
| 25 | MH 31-1132 | 1 | Open Sale | 20,000 | 21000/- |
| | | | **Offset Price Offer** | | |
| 26 | MH-31-9412 | 1 | 20,000 | 25,000 | 25750/- |

| Sr. No. | Particulars | Qty | Value | Tender Rate | Negotiatios Rate |
|---|---|---|---|---|---|
| 27 | MH-31-9237 | 1 | 15,000 | 20,000 | 20750/- |
| 28 | MH-35-B-9541 | 1 | 25,000 | 27,000 | 27750/- |
| 29 | MH-31-7073 | 1 | 70,000 | 72,000 | 72750/- |
| 30 | **Machinery** | | | | |
| | 1) Compressor Machinery,<br>2) Submersible Pump,<br>3) Generator,<br>4) Trailer Pump,<br>5) Portable Generator,<br>6) Air Coolar,<br>7) B. A. Set Cylinder,<br>8) Invertors,<br>9) Chain Saw,<br>10) Typing Machine,<br>11) Extinguisher,<br>12) Portable Honda Pump | 1<br>2<br>1<br>5<br>1<br>4<br>17<br>1<br>6<br>1<br>5<br>8 | Rs. 18 /kg | Rs. 21 /kg | 22.50/- Per Kg. |
| 31 | **Machinary Spare Parts** | | | | |
| | Spare Parts etc. | Lum Sum | Rs. 16 /kg | Rs. 19 /kg | 21/- Per Kg. |
| 32 | **Wooden Material** | | | | |
| | 1) Door<br>2) Chair<br>3) Table<br>4) Window<br>5) Tick wood, Bally | 7<br>1<br>2<br>5<br>42 | Rs. 05 /kg | Rs. 06 /kg | 06/- Per Kg. |
| 33 | **Rubber Material** | | | | |
| | 1) Rubber Boat ,<br>2) Hose Pipe<br>3) Plastic Chair<br>4) Plastic Can<br>5) Suction Pipe<br>6)Hose Reel<br>7) Tyre | 02<br>494<br>84<br>59<br>40<br>02<br>20 | Rs. 02 /kg | Rs. 2.90 /kg | 2.90/- Per Kg. |
| 34 | **Brass Material** | | | | |
| | 1) Male Coupling<br>2) Female Coupling<br>3) Stainer<br>4) Branch | 452<br>451<br>02<br>18 | Rs. 200 /kg | Rs. 253 /kg | 300/- Per Kg. (2nd time) |
| 35 | **Aluminum Material -** | | | | |
| | 1) Extension Ladder<br>2) Foam Branch | 14<br>07 | Rs. 60 /kg | Rs. 90 /kg | 105/- Per Kg. |

M/s. M. I. Engineering Stores, Nagpur यांनी सादर केलेल्या निविदा वाटाघाटी दराप्रमाणे अनु क्र. 1 ते 35 पर्यंतचे निर्लेखित असलेले वाहने, मशिनरी

व इतर भंगार साहित्य सदर फर्मला विक्री करून घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित निविदा दरापेक्षा अधिक दर प्राप्त होऊ शकता असे स्थायी समितीचे मत आहे प्रस्तावित विषयास फेर लघु निविदा करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 84:— प्र.क्र. 51 ब अंतर्गत धंतोली येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. आर. एम. दयारमानी यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 4.95 टक्के अधिक दराची रू. 5247071/— (रूपये बावन्न लक्ष सत्तेचाळीस हजार एकाहत्तर) स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली. हे काम पद क्र. 682 ( A22001330803) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी रू. 4999592/— लक्ष पर्यन्त सिमीत ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली. ठराव क्र. 20 अन्वये नविन वित्तीय वर्षात प्रावधान नोंदवुन फेरसादर करण्यात आलेल्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 85:— प्र.क्र. 56 अ अंतर्गत छत्रपतीनगर येथील रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. अमृत कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 4.60 टक्के अधिक दराची रू. 5225910/— (रूपये बावन्न लक्ष पंचविस हजार नऊशे दहा) स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली. हे काम पद क्र. 681 ( A22001330802) अंतर्गत प्रस्तावित असून या कामाकरीता रू. 4996100/— राशी ची तरतुद मुक्त करण्याच्या मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 86:— प्र.क्र. 57 अंतर्गत सुयोग नगर येथील, गुप्ता हार्डवेअर ते कन्टेनर डेपो पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. आर.एम. दयारमानी यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 4.50 टक्के अधिक दराची रू. 47,96,529/— (रूपये सत्तेचाळीस लक्ष छयान्नव हजार पाचशे एकोनतीस) स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली. हे काम पद क्र. 370 ( A22001330801) अंतर्गत प्रस्तावित असून या कामाकरीता रू. 4796529/— राशी ची तरतुद मुक्त करण्याच्या मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 87:— अजनी चौक, नागपूर येथील क्लॉक व टॉवर व त्या सभोतालचे परिसराचे विकास/सौंदर्यीकरण व रखरखाव बि.ओ.टी. तत्वावर १० वर्षाकरीता करणे आणि त्या मोबदल्यात ५ ठीकाणी गॅन्ट्रीवरील जाहिरातीचे हक्क प्रदान करण्यास्तव निविदा बोलवून खाली

नमुद केलेल्या अटी व शर्तीवर मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

अटी व शर्ती :—

१. क्लॉक व टॉवर आणि त्या सभौतालचा परिसराचा विकास/सौंदर्यीकरण व रखरखाव करण्यासाठी लागणारा निधी इच्छुक एजेन्सीला खर्च करावा लागेल.
२. उपरोक्त प्रकल्पाकरीता इच्छुक एजेन्सीधारकास, त्याने म.नपा. स द्यावयाचे सवलती शुल्क (Concession Fees) नमुद करावे लागेल. स्पर्धकांना निविदा प्रपत्रात नमुद केलेल्या सवलती शुल्काच्या आधारे कामाचा अधिकार देण्यात येईल. जो स्पर्धक सवलती शुल्काबाबत महत्तम शुल्क नमुद करेल त्याचा प्रस्ताव Techinical & Financial गुणाच्या आधारे पुढील मंजुरीकरीता सादर करण्यात येईल.
३. म.न.पा. तर्फे एजेन्सीधारकास जाहिरातीकरीता भु—भाडे (ग्राउंड रेंट) आकारण्यात येणार नाही. मात्र त्यांना म.न.पा. कडे शेड्युल्ड रेट नुसार जाहिरात शुल्क जमा करावे लागेल.
४. गॅंट्री उभारणीसाठी आवश्यक असणाऱ्या संबंधीत कार्यालयांची परवानगी मिळविण्याची जवाबदारी इच्छुक एजेन्सीची राहील.
५. जाहिरातीचे हक्क जास्तीत—जास्त १० वर्षाकरीता (Consession Period) मर्यादित राहील. कालावधी संपेपर्यंत प्रकल्पाची सर्व दृष्टीकोनातून देखभाल करण्याची जवाबदारी इच्छुक एजेन्सीची राहील.
६. महानगरपालिकेच्या 'The Outdoor Advertising Policy 2001' चे अटीं व शर्ती तसेच जाहिराती संबधात वेळोवेळी ठरविण्यात आलेले धोरण, ठराव एजेन्सीला बंधनकारक राहतील.
७. महानगरपालिकेव्दारे काही शासकीय कार्यक्रमाकरीता किंवा विविध सामाजिक योजनांबाबत जाहिराती करावयाच्या असल्यास त्या ठराविक कालावधीकरीता एजेन्सीधारकास विनामुल्य प्रदर्शित कराव्या लागतील.
८. कालावधी संपुष्टात आल्यानंतर सर्व विकासकामे इन्फ्रास्ट्रक्चर सहीत एजेन्सीव्दारे म.न.पा. ला विनामुल्य हस्तांतरीत करावे लागेल.

<u>ठराव क्रमांक 88</u>:— प्र.क्र. 69 अंतर्गत खामला मुख्य रस्ता ते पांडे ले—आऊट पर्यंत रोडचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. अमृत कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 4.95 टक्के अधिक दराची रू. 2727908/— (रूपये सत्तावीस लक्ष सत्तावीस हजार नऊसे आठ) स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली. हे काम पद क्र. 370 (A22001330801) अंतर्गत प्रस्तावित असून या कामाकरीता रू. 2727908/— राशी ची तरतुद मुक्त करण्याच्या मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 89</u>:— मसर्स डी.आर.ए.–एस.टी.सी. (संयुक्त) कन्सलटंट प्रा. लि. नागपूर या व्यवस्थापकीय सल्लागाराची जेएनएनयुआरएम अंतर्गत मंजर नागपूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजना, पेंच टप्पा–4 करीता नियुक्ती केली होती.

नुकतीच ही योजना यशस्वीरीत्या पूर्ण होवून लोकार्पण सोहळा पार पडलेला आहे. या योजनेमुळे शहराला 115 एम.एल.डी. अतिरिक्त पाण्यापैकी पुरवठा होत आहे. प्रत्यक्षरित्या योजना कार्यान्वयीत असली तरी किरकोळ स्वरूपाची कामे प्रकल्पांतर्गत नव्याने बांधण्यात येणारी चार उंचीवरील जलकुंभ, अस्तित्वात पाणी पुरवठा प्रणालीमध्ये आंतर जोडणीची कामे, जलवाहिन्या स्वच्छतेची कामे व्हॉल्व उभारणीची कामे शिल्लक आहेत. तसेच कंत्राटदाराचे अंतिम देयके Extra, Excess कामे, Claims इत्यादीचे महत्वपूर्ण कामे करावयाचे आहे. मनपाकडे मनुष्यबळाची कमतरता असल्यामुळे उपरोक्त कामावर देखरेख करण्याकरीता प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागारांची सेवा घेणे क्रमप्राप्त आहे. सर्व दृष्टीने योजना पूर्ण करण्याकरीता व शिल्लक कामांचा जलदगतीने निपटारा करण्याकरीता प्रकल्प सल्लागार मेसर्स डी.आर.ए. – एस.टी.सी. (संयुक्त) प्रा.लि. यांना माहे एप्रिल 2015 ते ऑगष्ट 2015 पर्यंत मुदतवाढ रू. 17,75,000/– लक्ष प्रतिमाह प्रमाणे एकुण पाच महिन्याकरीता रू. 88,75,000/– चे खर्चास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 90</u>:— शहर परिवहन व्यवस्थेत सुधारणेकरीता नविन १२५० बसेस खरेदी करण्याबाबत केंद्र शासनाचे अधिनियमाअंतर्गत केंद्रिय वित्तीय सहायता उपलब्ध करून घेण्याकरीता लागणाऱ्या खर्चाचा विस्तुत आराखडा (Detail Project Report) अभियानाचा Toolkits and Guidelines प्रमाणे तयार करण्याकरीता मा. स्थायी समिती ठराव क्र. ६८८, दि. २७/०२/२००९ अन्वये मे. दिनेश राठी ॲड असोसिएट कंपनी, नागपूर या तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती बसेस किंमतीच्या १.२५ टक्के (Capital Cost of Buses) दरावर मान्यता प्राप्त असुन त्याच धर्तीवर अतिरिक्त काम करावयाचे असल्यामुळे मे. दिनेश राठी ॲड असोसिएट कंपनी, नागपूर या तांत्रिक सल्लागाराची यांची पूर्वीचे मंजूर दरावर ४० टक्केनी कमी दरावर सुट देऊन विस्तुत आराखडा (DPR) तयार करवून घेण्याकरीता मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्यात येते, तसेच रू. ४४.७७ लक्ष पर्यंत राशी सिमीत राहील. जुन्या DPR मधील अटी व शर्ती प्रमाणे प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागाराकडुन कार्य करून घेणे. कार्यालयाची जवाबदारी राहील या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 91</u>:— मा. पदाधिकारी/अधिकारी यांना कार्यालयीन कामाकरीता एकमेकांशी सुसंवाद साधण्यासाठी मोबाईल संच म.न.पा. कडून पुरविण्यात येत असतात मा. पदाधिकारी/अधिकारी यांना किती किमतीचे मोबाईल

संच पुरविण्यात यावी याबाबत खालीलप्रमाणे धोरणांस मंजूरी प्रदान करण्यांचा प्रश्न,
खर्चाचे प्रावधान पद क्र. ९ स्टेशनरी साहित्य खरेदी मध्ये करण्यात आलेली आहे.

| अनु. क्र | मा. पदाधिकारी/अधिकारी | किंमत |
|---|---|---|
| १ | मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. अध्यक्ष स्थायी समिती, मा. आयुक्त | रू. ५०,०००/— पर्यंत |
| २ | मा. सत्तापक्ष नेते व मा.विरोधी पक्ष नेते,मा. अपर आयुक्त, | रू. ४०,०००/— पर्यंत |
| ३ | मा. झोनल सभापती व वेगवेगळया समित्यांचे अध्यक्ष, मा.उपायुक्त/मा. अति. उपायुक्त | रू. १०,०००/— पर्यंत |

मोबाईल वापराचा कालावधी मा.पदाधिकारी/अधिकारी पदावर असेपर्यंत राहिल व त्यानंतर खालीलप्रमाणे घसारा/अवक्षयन (Depriciation) काढून येणारी उर्वरित रक्कम त्यांचेकडून वसूल करून मनपा फंडात जमा करण्यात येईल. हॅन्डसेट दुरूस्ती/हरविल्यास याबाबतची जवाबदारी संबधितांची राहील.

खरेदी किंमत रू. १००/—
वजा रू. ३०/—पहिल्या वर्षी ३० टक्के
घसारा/अवक्षयन
———————— (**Depriciation**)
रू. ७०/—
वजा रू. २१/— दुस—या वर्षी ३० टक्के
घसारा/अवक्षयन
———————— ( **Depriciation** )
रू .४९
वजा रू. १५/— तिस—या वर्षी ३० टक्के
घसारा/अवक्षयन
———————— ( **Depriciation** )
रू. ३४/—

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन,
अनु.क्र. १ प्रस्तावित किंमत रू. ५०,०००/— ती रू. २०,०००/— कमी करण्यात येते.
अनु.क्र. २ प्रस्तावित किंमत रू. ४०,०००/— ती रू. १५,०००/— कमी करण्यात येते.
अनु.क्र. ३ प्रस्तावित किंमत रू. १०,०००/— मंजूर.

पदाधिकारी किंवा अधिकारी अधिक रकमेचे संच घ्यावयाचे असल्यास त्यांना स्वत:ची रक्कम टाकण्याची मुभा राहील, तसेच ०१.०८.२०११ च्या निर्णयानुसार कालबाहय इलेक्ट्रॉनीक्स वस्तुसाठी घसारा/अवक्षयन ६०टक्के गृहीत धरावा या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 92</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर